-४- 99-

शासकीय अधिका-यांना वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
पूरक पत्र क्र.अग्रिम-1098/प्र.क्र.16/98/विनियम.
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक:- 17 जून, 1998.

वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अग्रिम-1096/प्र.क्र.41/96/विनियम, दिनांक:- 30.10.1996.

**पूरक पत्र:-** शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अग्रिम-1096/प्र.क्र.41/96/विनियम, दिनांक 30.10.1996 अन्वये वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम देण्याची सुविधा शासनाने उपलब्ध केली आहे. तथापि अधिकाधिक शासकीय अधिका-यांनी वैयक्तिक संगणक खरेदी करुन आपले संगणकीय ज्ञान वाढवावे की, ज्यामुळे शासनाच्या कामकाजाच्या दृष्टीने त्याचा फायदा व्हावा म्हणून शासनाने आणखी काही सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(1) ज्या राजपत्रित अधिका-यांचे मूळ वेतन रु.2000/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे (राजपत्रित कक्ष अधिकारी व इतर वरिष्ठ राजपत्रित अधिकारी) त्यांना वैयक्तिक संगणक अग्रिम अनुज्ञेय राहील.

(2) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अग्रिम-1096/प्र.क्र.41/96/विनियम, दिनांक 30.10.1996 मधील अट क्र.(5) अन्वये संगणक अग्रिमावर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या व्याज दराने व्याज आकारण्यात यावे असे नमूद केलेले आहे. त्यांत सुधारणा करुन असे आदेश देण्यात येत आहेत की, दिनांक 1.7.1998 पासून वैयक्तिक संगणक खरेदी अग्रिम हे व्याजरहित अग्रिम राहील.

(3) वैयक्तिक संगणक खरेदीकरिता ज्या शासकीय अधिका-यांनी यापूर्वी अग्रिम घेतलेला आहे, परंतु दिनांक 30.6.1998 पर्यंत त्यावरील व्याजाच्या वसुलीत नियमांनुसार सुरुवात झालेली नाही त्या सर्व अग्रिम धारकांना व्याज माफ करण्यात येत आहे. मात्र, ज्या शासकीय अधिका-यांचे दिनांक 30.6.1998 पर्यंत देय असलेले व्याज वसूल करण्यात आले आहे त्यांना दिनांक 1.7.1998 पासून पुढील व्याज माफ करण्यात येत आहे.

(4) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अग्रिम-1096/प्र.क्र.41/96/विनियम, दिनांक 30.10.1996 मधील अट क्र.(1) आणि (5) व्यतिरिक्त इतर सर्व अटी तशाच लागू राहतील.

HB-VII
12-8-98

92648

2. वैयक्तिक संगणक अग्रिम मंजूरी प्राधिका-याकडून या बाबींवर खर्च करण्यात येणारी रक्कम त्या त्या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदींतूनच भागविण्यात यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
5 JUL 1998
प्र. लि. नि. उ. जि. [illegible]

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वर्षा अ.नाईक
शासनाच्या उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-1, महाराष्ट्र, मुंबई-400 020,